पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 17/02/2020 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दिनांक 06/02/2020 चे 20.30 वा. दरम्यान अल्पवयीन 13 वर्षीय फिर्यादी/पीडित हिला आरोपी नामे– अखिलेश शंकर राम, वय 28 वर्षे, रा. वार्ड क्र. 5, बुटीबोरी हा मागील 8 दिवसा पासुन सारखा पाहत होता. तसेच पीडिता हि तिच्या भावंड व मामासह जेवन झाल्यावर गार्डनमध्ये फिरण्यास गेली असता मामा फोनवर बोलत असतांना पाहुन आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 504, 506 भादंवी. सहकलम सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि थोरात हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :–अंतर्गत 13 कि.मी. बोरी ते मेंडकी रोड बोरी शिवार येथे दिनांक 21/12/2019 चे 14:30 वा. ते 15:00 वा. दरम्यान मृतक/आरोपी –युकेश प्रल्हाद रक्षीत, वय 27 वर्ष, रा. मेंडकी हा त्याच्या एम.एच–40/ए. एच–2745 क्रमांकाच्या मोटरसायकलने मेंडकी वरून बोरी रोडने जात होता. दरम्यान बोरी शिवारामध्ये युकेश रक्षीत याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवीत असता रोड वळणावर मोटारसायकलवरचा ताबा सुटल्याने मोटारसायकल स्लिप होवुन रोडवर घासत जावुन रोडचे कडेवर पडला. या अपघातात युकेश रक्षीत याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यास उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय, काटोल व नंतर मेयो हॉस्पिटल नागपुर येथे नेले असता दिनांक 26/12/2019 चे रात्री 23:45 वा. त्याचा मृत्यू झाला. मर्ग क्र. 105/2019 कलम 174 जा.फौ. प्रमाणे दाखल असुन पि.एम.रिपोर्ट प्राप्त केला असता मर्ग चौकशी अहवाला वरून मृतक हा स्वतः मरणास कारणीभुत ठरला. .

सदर प्रकरणी सर तर्फे सफौ जवाहर चव्हाण, पो. स्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ जवाहर चव्हाण 9545363221 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर वेणा नदीचे काठावर जुनी वस्ती बुटीबोरी येथे दिनांक 16/02/2020 चे 14.45 वा. दरम्यान सुंदरलाल झमकलाला आहाके, वय 59 वर्षे, रा. विंपामंडई, ता. आमला, जि. बैतुल मध्यप्रदेश हे फिर्यादींच्या शेताचे नाल्यामध्ये पाण्याच्या गाळात फसुन मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजयसिंह बबनसिंह चंदेल, वय 54 वर्ष, रा प्रभाग क 8 वार्ड क 2 बुटीबोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार वडमे 9522171481 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर